महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१
Email id :- mscepune@gmail.com फोन क्रमांक :- ०२०-२६१२३०६६/६७

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०२२/ 85
दिनांक :- ११ /०१/२०२२

**प्रति,**

**शासनमान्य संस्थाचालक (सर्व)**
**महाराष्ट्र व गोवा**

**विषय :-माहे फेब्रुवारी / मार्च - २०२२ मधील जीसीसी, जीसीसी-टिबीसी आणि जीसीसी- एसएसडी - सीटीसी परीक्षांची आवेदनपत्र भरणेसाठीच्या कालावधीबाबत.**

**संदर्भ :-१)** जी.सी.सी.परीक्षेची जा.क्र. ३७८२, दि. १०/१२/२०२१ रोजीची अधिसूचना.
२) जी.सी.सी.-टी.बी.सी.परीक्षेची जा.क्र.३७८६, दि.१०/१२/२०२१ रोजीची अधिसूचना.
३) जी.सी.सी.-एस.एस.डी.-सी.टी.सी.परीक्षेची जा.क्र.३७८७, दि.१०/१२/२०२१ रोजीची अधिसूचना.
४) या कार्यालयाचे जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०२२/१८,दि.०४/०१/२०२२ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयी जीसीसी, जीसीसी-टिबीसी आणि जीसीसी- एसएसडी-सीटीसी या परीक्षांच्या अधिसूचना संदर्भान्वये परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

सदरील प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसूचनांनुसार राज्यातील शासन मान्यता प्राप्त टंकलेखन/ लघुलेखन व संगणक टंकलेखन संस्थांमधील नियमित शुल्क आकारुन विद्यार्थ्यांची आवेदनपत्र भरण्यासाठी दि.१३/१२/२०२१ पासून पुढिल २० दिवसापर्यंत ऑनलाईन लिंक देण्यात आलेली होती.

तसेच संदर्भ क्र. ४ च्या पत्रानुसार सदरील नियमित शुल्कासह ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी दि.११/०१/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

या पत्राद्वारे आपणांस कळविण्यात येते कि, सदरील प्रस्तावित परीक्षांच्या नियमित,विलंब व अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र भरणेबाबतची मुदत यथावकाश कळविण्यात येईल.यांची सर्व शासनमान्य संस्थाचालकांनी नोंद घ्यावी.

**(हरूण आतार)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१.**

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव:**
**१) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).**
**२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व).**
**३) शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उ/द/प)**

D:\S\letter\Mantralay Patr.docx